

# छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९४३ । वर्ष २१ अंक ११।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३० अंक १)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे २८



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक!




YouTube

**ERCJPP या YouTube चॅनेलचे सभासद व्हा !**

**चला आनंदी शिक्षणाची सुरुवात करूया**

# शैक्षणिक साधन केंद्र

**विविध प्रकल्पांच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञानाच्या साह्याने प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोचवण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी, पुणे संचलित**

## इ-अंक पाहाण्यासाठी... विशेष रचना

(हव्या त्या लेखावर थेट जाण्यासाठी आधी खालील सूचना वाचा व त्यानुसार कृती करा.)

* (स्क्रोल केल्यानंतर) 'अंतरंगा'चे पान येईल त्यानंतर 'संवादा'चे पान दिसेल.
* अंतरंगात अंकातील सर्व साहित्याची यादी पाहायला मिळेल. त्यापैकी जो लेख तुम्ही वाचू इच्छिता त्या 'शीर्षका'ला क्लिक केल्यावर तुम्ही थेट त्या लेखावर जाऊन तो लेख वाचू शकाल.
* लेखाच्या शेवटी पान क्रमांकावर क्लिक केल्यास परत तुम्ही अंतरंगावर येऊ शकाल व पुन्हा तुम्हाला हव्या त्या लेखाच्या शीर्षकावर क्लिक करता येईल.
* ज्या लेखांना क्यू आर कोड दिले आहेत तेथे क्यू आर कोडवर क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

छात्र प्रबोधन मासिकाचे
तिसाव्या वर्षात पदार्पण!

# छात्र प्रबोधन

**सौर श्रावण, शके १९४३। वर्ष २१ अंक ११**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३४९ वा अंक, वर्ष ३० अंक १)

प्रकाशन दिनांक – सौर १० श्रावण, शके १९४३/१ ऑगस्ट २०२१


## अंतरंग


४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी

५. कथा ... **हॅपीवाला बर्थडे...!*** – अनादि अनंत

११. ललित.. **हृदयस्पर्शी आठवणी*** – विजय जोरी

१४. माहितीपर... **अन्न भेसळ कशी ओळखाल?*** – संकलित

१५. लेखमाला...**तंत्रस्नेही अध्ययन कौशल्य** (लेखांक २)– प्रशांत दिवेकर

१८. मुलांचे पान... **चित्रावरून म्हणी ओळखा...** – चि. कृष्णा बोर्डे

१९. कृलाकृती... **कागदाचा पेंग्विन*** – तुकाराम पाटील

२०. **नूतन संपादक मंडळ परिचय**

२१. ललित... **कवितेतला पाऊस!*** – शैलजा देशमुख

मलपृष्ठाच्या आतील पद्य... हे **कर्मयोगिन्*** – वाच. स्वर्णलता भिशीकर

**याशिवाय :** बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक* (१०),बुद्धिला खुराक...(१७), हसा हसाऽऽ, प्रतिसादी वाचकवीर व्हा...(२६)


**पानाखालील ओळी : माहितीपर** – काही अभिमानास्पद घटना दर्शवणारी स्वातंत्र्योत्तर भारताची कालरेषा

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...**

*** या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.**
**त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.**

**मुखपृष्ठाविषयी :** मुंबई–पुण्यास जोडणाऱ्या या बोरघाटातील अप्रतिम निसर्ग सौंदर्याची चित्रकारास भुरळ पडली नाही तरच नवल! बोगद्याच्या काळ्याकुट्ट पोटात प्रवेश करणाऱ्या या समांतर चार लोहरेषा म्हणजे चित्रातील उत्तम परस्पेक्टिव्ह होय!

**– भास्कर सगर**


**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक : ₹ १८०* सवलतीत**
**द्वैवार्षिक : ₹ ४००, त्रैवार्षिक : ₹ ५५०**
**दशवार्षिक : ₹ १७००**
**इ–अंक वार्षिक वर्गणी –**
**₹ १०० (सवलत मूल्य रु. ३०)***
**(*सवलत ३१ ऑगस्टपर्यंत लागू)**



**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५
**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org


**ज्ञान प्रबोधिनीच्या पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या सभासद नोंदणीसाठी jpprakashane.org या संकेतस्थळाला भेट द्या!!**
**(अधिकाधिक जणांनी या संकेतस्थळावरूनच मासिकाची नोंदणी करावी, ज्यांना अगदीच अशक्य असेल अशांनी स्वतंत्रपणे M.O./NEFT चा वापर करावा.)**


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन
मल्हार अरणकल्ले
स्वाती ताडफळे

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
अनादि ढवळे

**मुखपृष्ठ :** भास्कर सगर

**आतील चित्रे :** राहुल देशपांडे

**या अंकाची किंमत : ₹ २०/–**
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा
चेक/डी.डी. **'ज्ञान प्रबोधिनी'** अथवा **'Jnana Prabodhini'** याच नावाने काढावा.

**NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –**
**Account Name** - Jnana Prabodhini
**Bank Name** - Bank Of India
**Account No.** - 051510110004917
**Branch** - Shanipar, Pune
**IFSC Code** - BKID0000515
ऑनलाइन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.


छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक देणगीदार – • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • श्री. शशांक चांदोरकर, पुणे • श्री. उदय परांजपे, पुणे

संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

सौर श्रावणचा (ऑगस्ट) 'छात्र प्रबोधन'चा अंक प्रकाशित होताना विशेष आनंद होतो आहे. **आज आपल्या सर्वांचं लाडकं 'छात्र प्रबोधन' तिसाव्या वर्षात पदार्पण करत आहे!** तिसाव्या वर्षाच्या निमित्ताने दोन नवीन व्यक्तींची भर संपादक मंडळाच्या माध्यमातून आपल्या परिवारात पडत आहे. त्यांचे मनापासून स्वागत! मासिकाच्या वर्धिष्णू वाटचालीसाठी त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा, तज्ज्ञतेचा उपयोग निश्चितच होईल. या वर्षात 'छात्र प्रबोधन'च्या साहित्यातून सुमारे २५ पुस्तके लवकरच **तुमच्या भेटीला येणार आहेत.** याशिवाय वर्षभरात **माननीय संपादक व विविध क्षेत्रांतल्या अनेक मान्यवरांशी गप्पांचे कुमारांसाठीची ऑनलाइन कार्यक्रम, कुमार साहित्य संमेलन** असणार आहेत. 'छात्र प्रबोधन'चं हे तिसावं वर्ष 'आपण कसं साजरं करू या!' याबाबतच्या तुमच्या काही नावीन्यपूर्ण कल्पना या महिनाअखेरपर्यंत 'छात्र प्रबोधन'ला मेल करून पाठवा. त्यातील योग्य वाटणाऱ्या कल्पक कल्पना राबवण्याचा नक्की विचार करू.

आजपर्यंतच्या या प्रवासात कुमारांना वाचनाची गोडी लागावी, साहित्याची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने संपादक मंडळातील सदस्यांनी अनेक सिद्धहस्त लेखकांना कुमारांसाठी लिहितं केलं. प्रथितयश चित्रकारांनी लेखांना साजेशी चित्रं काढून, उत्कृष्ठ मुखपृष्ठं चितारून अंक देखणे केले. मा. संपादकांनी मासिकाला आधुनिक तंत्रज्ञानाची वेळोवेळी जोड दिली. त्याबाबत अनेक प्रयोग केले. उदा. आत्तापर्यंतच्या २९ वर्षातील लेखांचे *डिजिटायझेशन* असेल, अंकातील साहित्याला *क्यूआर कोडची* जोड असेल, इ-अंक असेल, कुमारकथा *अॅप* निर्मिती असेल, मासिकाच्या *ऑनलाइन* नोंदणीसाठी संकेतस्थळ कार्यान्वित करणं असेल इ. मासिकाने आशयाच्या व तंत्रज्ञानाच्या बाबतीत कालोचित बदल केले. बाह्य परिस्थितीनुसार कोरोना काळात स्पर्धा-उपक्रमांचे स्वरूप बदलले. या सगळ्या प्रवासांत अनेक लेखक, चित्रकार, मुद्रक, प्रायोजक, देणगीदार, जाहिरातदार, गावोगावचे केंद्रप्रमुख, हितचिंतक यांच्या सहकार्याचा, पाठिंब्याचा मोलाचा वाटा आहे; याची आम्हाला जाणीव आहे! त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

नुकताच **'ऐपावाक'** (ऐका-पाहा-वाचा-करा) **या सुट्टीतल्या उपक्रमाचा सांगता समारंभ** व कृती स्पर्धा टप्पा २ (१ जून ते २० जून दरम्यान *व्हॉटसअॅप* माध्यमातून दिलेल्या २० कृती पूर्ण करणे)चा ***ऑनलाइन* बक्षीस समारंभ** संपन्न झाला. १२६ विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे अनुभव मिळवत काही ना काही कृती पूर्ण करण्यातला आनंद घेतला! एकूण २४ विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळवली. खेळ, गटचर्चा व मान्यवरांचं मार्गदर्शन असं सांगता समारंभाचं स्वरूप होतं. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ लेखक, कवी मा. प्रवीण दवणे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना दवणेसरांनी तपशीलात उत्तरे देऊन मुलांना वाचन-लेखनासाठी प्रेरित केलं, उत्तेजन दिलं! सुरुवातीला मा. संपादकांनी 'वाचन कौशल्य' याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

सुट्टीतला 'ऐपावाक' उपक्रम संपला असला तरी **'ऐपावाक-स्वयंविकास' हा वर्षभर चालणारा उपक्रम १० जुलैपासून सुरू झाला आहे.** त्यात अजून सहभागी झाला नसाल तर आजच jpprakashane.org या संकेतस्थळावर नोंदणी करा व सुरुवातीपासूनच्या अगदी १० जुलै पासूनच्या लिंक्स् तुम्ही पाहू शकाल, वर्षभर कितीही वेळा!!

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. त्या निमित्ताने राष्ट्रीय स्तरावरच्या काही अभिमानास्पद घटनांची कालरेषा पानांखाली दिली आहे. त्या घटनांविषयी अधिक माहिती मिळवा. 'भारत माझा देश आहे' हा आदरभाव दर्शवणारा कृतिसंकल्प या निमित्ताने तुम्ही करा. आणि तो आम्हालाही कळवा!

**तुम्हाला स्वातंत्र्यदिनाच्या अनेक शुभेच्छा!**

तुमची,
**शिल्पाताई**

ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये हॉकी खेळात स्वातंत्र्योत्तर पहिले सुवर्णपदक — इ.स. १९४८

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण — इ.स. १९४९

स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – • श्री. अमित बागाईतकर, पुणे • श्री. संजय प्रधान, सातारा
• श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु – कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.

# हॅप्पीवाला बर्थ-डे

– अनादि अनंत

कथा

**वेगवेगळ्या थीमस्, गिफ्टस् आणि पार्ट्या यांमध्ये अडकून पडलेल्या हॅप्पी बर्थ–डेपासून ते नवा अनुभव देऊन मोठ्ठं करून जाणाऱ्या वाढदिवसापर्यंतच्या प्रवासाची ही कथा!**

‘‘आई दे ना गं पाचशे रुपये... *प्लिज.*’’ सकाळी सकाळी आईच्या मागेमागे फिरत अनन्याची भुणभुण सुरू होती.

‘‘अगं अनू, या महिन्यातला चौथा वाढदिवस आहे हा! आणि इतकी महागडी *गिफ्ट* एकमेकांना देण्याचं वय आहे का तुमचं?’’

‘‘असं काय गं करतेस आई... मागच्या महिन्यात सेजलच्या *बर्थ*–डे *पार्टीच्यावेळी* तर पूर्वीने तिला १०००/– रुपयांचे *वायरलेस* हेडफोन *गिफ्ट* केले! किती भाव खाते पूर्वी आता. सेजल आणि तिचं तर अगदी गुळपीठ असतं नुसतं! मागच्या आठवड्यात सेजलनी पूर्वीला एकटीला अगदी खास आमंत्रण देऊन स्वतःच्या घरी नेलं होतं. खूप धमाल केली त्यांनी! आणि तुला माहितीये का, आपण चांगलं *गिफ्ट* नाही दिलं, तर मैत्रिणी नाराज होतात गं. आणि मला ना, एकटं नाही पडायचं. *प्लिज* दे ना पाचशे रुपये.’’ अनन्या अगदी काकुळतीला येऊन म्हणाली.

प्रकरण वाटतं तितकं सोपं नाही, हे आईच्या लक्षात आलं; पण हे सगळं अगदी हळुवारपणे हाताळायला पाहिजे, हेही ती जाणून होती. अनन्याची आई बाल–मानसोपचारतज्ज्ञ असल्यामुळे तिच्या डोक्यात



हिंदी राष्ट्रभाषा असल्याची घटना समितीची घोषणा — इ.स. १९४९

भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी — इ. स. १९५०

स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – • श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे • श्री. आदित्य मोडक, डोंबिवली
• एक हितचिंतक, नाशिक – कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ

एक वेगळीच भन्नाट कल्पना आली. 'योग्य वेळ आली की, या सगळ्यांनाच समजावून पाहू' असा विचार करत त्या स्वत:शीच हसल्या. नेमकं तेव्हाच अनन्याने आईकडे पाहिलं.

''अगं आई हसतेस काय? इथे माझी अवस्था किती बिकट झालीये, हे तुझ्या लक्षातच येत नाहीये. पुढच्या आठवड्यात माझा *बर्थडे* आहे ना! मग आत्ताच आपल्याला मिळणाऱ्या *गिफ्ट्सचे स्टँडर्डस्* ठरवून द्यावे लागतील. आपण इतरांना वर्षभर जशी *गिफ्ट्स* देतो, ते लक्षात ठेवून तशीच *गिफ्ट्स* ते आपल्याला देतात.

''अरे बापरे! असं पण आहे का? मोठाच गंभीर मामला आहे मग हा! ठीक आहे, मी देईन तुला पाचशे रुपये पण...''

''*थँक यू* आयडा! मला माहिती होतं, तू मला नक्की समजून घेशील म्हणून!''

''थांब थांब, माझं म्हणणं पूर्ण ऐकून घे आधी. मी तुला आत्ता पैसे देते; पण तुझ्या या महिन्याच्या *पॉकेटमनीच्या* बदल्यात. बोल आहे का कबूल?''

अनन्या क्षणभर विचारात पडली. पण 'पुढचं पुढे बघू,' असा विचार तिने केला. तोंड वाकडे करत ती म्हणाली, ''बरं, मान्य करण्यावाचून काही पर्याय आहे का मला? जाऊ दे, दे आता पैसे पटकन. मला उशीर होतोय.

रात्री जेवणाच्या वेळी अनन्याच्या घरचे सगळेजण एकत्र जेवायला बसले होते.

''काय मग अनू, दिवसभर काय काय केलं आज?'' बाबांनी रोजच्यासारखं विचारलं. मग श्रेयाच्या *बर्थडे पार्टीचं* गुणगान सुरू झालं.

''३ *लेयर्सचा* मोठा केक आणला होता, रसमलई *फ्लेवरचा!* काय भारी होता तो! तिच्या आईने *स्नो-व्हाईट थीम* ठरवली होती. सगळं *डेकोरेशन* पांढऱ्याशुभ्र रंगात! मस्त बर्फात गेल्यासारखं वाटत होतं. तिला १५ वर्ष पूर्ण झाली म्हणून तिला तिच्या आईबाबांनी निवडक १५ *गिफ्ट्स* पण दिल्या, कसलं भारी ना! मग आम्ही सगळ्यांनी पण तिला *गिफ्टस्* दिल्या. मी तिला खूप दिवसांपासून पाहिजे असलेलं - एकदम *रेअर कलरचं नेलपॉलिश* घेऊन दिलं, एकदम *ब्रँडेड!* असली खुश झाली ना श्रेया! तिने आम्हाला *रिटर्न गिफ्ट* पण असलं भारी दिलंय ना! *व्हाईट चॉकलेट* आहे अमेरिकेतून आणलेलं! आणि नंतर *स्नॅक्स* म्हणून तर काय काय होतं सांगू? *व्हाईट सॉस पास्ता, चीज टोस्ट, मोमोज,* काजूकतली, व्हॅनिला मिल्कशेक... म्हणजे जेवण पण सगळं *स्नो व्हाईट!''* अनन्या अगदी उत्साहाने सगळं सांगत होती.

''एक मिनिट, म्हणजे तू त्या पाचशे रुपयांत *नेलपेंटची* फक्त एक बाटली आणलीस?'' आईने अनन्याच्या उत्साहाला आवर घालत इतका वेळ तिला खटकणारी गोष्ट विचारलीच शेवटी.

''हो. अगं आई, ब्रँडेड आहे ते. महागच असतं.'' अनन्या बेफिकिरीने उत्तरली. आणि पुढे म्हणाली, ''माझ्या *बर्थडेला* पण अशीच भारी *थीम* ठरवा हं तुम्ही. सगळ्यांना काहीतरी वेगळं, मस्त वाटलं पाहिजे.'' आत्ता नको हा विषय वाढवायला म्हणून आईने ती चर्चा हो-हो म्हणत तिथेच आटोपती घेतली.

***

आज अनन्याच्या घरात सगळ्यांची लगबग सुरू होती. अनन्याच्या वाढदिवसाची जय्यत



वार्षिक देणगीदार - • डॉ. प्रियव्रत देशपांडे, चेन्नई • श्री. चैतन्य वझे, डोंबिवली • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद

तयारी सुरू होती. अनन्याला *सरप्राईज* म्हणून अनन्याचे मामा-मामी पण आजीबरोबर आले होते. अनन्याची मामेबहीण-नंदिनीसुद्धा आली होती. त्यामुळे अनन्या फारच आनंदात होती; पण आईची योजना तिला माहीत नव्हती. अनन्याचा हा वाढदिवस अगदी संस्मरणीय होणार होता. आईची तयारी पूर्ण होत आली होती. अनन्याच्या मैत्रिणी जमायला सुरुवात झाली. घराची सजावट पूर्णतः पर्यावरणपूरक पद्धतीने केलेली दिसत होती. कुठेही फुगे-झिरमिळ्या लावलेले दिसत नव्हते. सगळीकडे फुलझाडांची छोटी-छोटी रोपं मांडून ठेवली होती. त्यांच्यावरच्या फुलांची रंगसंगती लक्षात घेऊन त्यांची सुरेख रचना केली होती. छोट्या-छोट्या वेली घरात सगळीकडे सोडलेल्या दिसत होत्या. त्यामुळे घरात एक वेगळीच प्रसन्नता जाणवत होती. सुगंधी फुलांनी भरलेले काचेचे *बाऊल* सौंदर्य तर वाढवत होतेच; पण त्यांच्या दरवळणाऱ्या मंद सुवासामुळे एक वेगळाच ताजेपणा तिथे भरून राहिला होता.

भिंतीवर गुलाबाच्या पाकळ्यांनी अनन्याचे नाव लिहिले होते. त्याच्या बाजूलाच गेल्या १५ वर्षातील अनन्याचे विशेष क्षण दाखवणारे अगदी तिच्या जन्मापासूनचे निवडक *फोटोही* लावलेले होते. सगळ्या हिरव्या पार्श्वभूमीवर ही सजावट अगदी उठून दिसत होती. तिच्या मैत्रिणी तर ही अनोखी सजावट पाहातच राहिल्या. ही बहुतेक *'जंगल थीम'* असावी, अशी त्यांची आपापसात चर्चाही सुरू झाली. इतक्यात एक *मिनी बस* त्यांच्या बंगल्याच्या दारात येऊन थांबली. त्या गाडीतून १५ - २० मुलेमुली खाली उतरली. ती सगळीजणं हा बंगला, हे वातावरण बघून बावरल्यासारखी दिसत होती. अनन्याच्या मामाने पटकन पुढे येऊन त्या सगळ्यांना घरात बोलावलं. निवांत बसायला सांगितलं. सगळी बच्चेकंपनी अंदाज घेत-घेत घरात शिरली. दाखवलेल्या ठिकाणी जाऊन बसली.

आईने अनन्याला हाक मारली. आजीने स्वतः शिवलेला फिकट आकाशी रंगाचा मलमली फ्रॉक घातलेली अनन्या एखाद्या परीसारखीच दिसत होती. *मॅडमचा* नट्टापट्टाही उरकत आला होता. आरशात स्वतःकडे समाधानाने बघून अनन्या खाली



आली. सजावट बघून तिला एकीकडे खरंच मस्त वाटलं होतं. तिच्या भाषेत सांगायचं, तर आईने अगदी *युनिक आयडिया* निवडली होती; पण आता मैत्रिणी आपल्याला नक्की 'गावंढळ' म्हणून चिडवणार असं तिला मनात वाटू लागलं. तेवढ्यात सेजल म्हणाली, ''अनन्या, वॉव! तुमची जंगल *थीम* किती भारी आहे.'' सेजलने भारी म्हणल्यावर अनन्याची कळी लगेच खुलली. कोपऱ्यात बावरून बसलेल्या बच्चेकंपनीकडे पाहाताच अनन्या गोंधळून गेली. तेवढ्यात अनन्याचे आईबाबा पुढे आले. त्यांनी अनन्याला खुर्चीवर नेऊन बसवलं. आई, आजी, मामी, अनन्याच्या शेजारी राहणाऱ्या साने काकू यांनी तिला

भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आली — इ. स. १९५६
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा
गोवा, दीव व दमण हे प्रदेश पोर्तुगिजांच्या ताब्यातून मुक्त — इ. स. १९६१

वार्षिक देणगीदार - • सौ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर, जि. धुळे • सौ. सीमा परांजपे, पुणे • श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर

औक्षण केलं. आजीने अनन्याला पाकीट दिलं. मामा-मामीने तिला छान ड्रेस घेतला. पंधरावा वाढदिवस म्हणून आईबाबांनी तिला १५ निवडक पुस्तकं भेट दिली. 'आता मात्र आपलं मैत्रिणींमधलं *स्टेटस* नक्की कमी होणार' असं अनन्याला वाटायला लागलं. आई हे असं काय करतीये हे तिला समजेचना. जाऊ दे, आता केक तरी चांगला असावा म्हणजे हे *गिफ्ट* प्रकरण मागे पडेल, असा विचार तिनं केला.

तेवढ्यात कोपऱ्यात अवघडून बसलेल्या त्या छोट्या मुलांबरोबर आलेल्या ताईंनी इशारा केला. लगेच ती मुले-मुली खुल्या आवाजात

'सुदिनम् सुदिनम् जन्मदिनम्
तव भवतु मंगलम् जन्मदिनम्'

असं गाणं म्हणायला लागली. त्यांचं गाणं संपताच अनन्या ताडकन उठून उभी राहिली. आईकडे बघून म्हणाली, ''आई काय आहे हे सगळं? केक कुठंय??''

अनन्याची आई अनन्याजवळ जाऊन उभी राहिली. तिच्या पाठीवरून हात फिरवत; पण सगळ्यांना उद्देशून म्हणाली, ''हे सगळं नक्की काय सुरू आहे, असं वाटत असेल ना तुम्हाला? सगळं सविस्तर सांगते तुम्हाला, ही सगळी कल्पना माझीच आहे. श्रेयाच्या *बर्थडे पार्टीवरून* आल्यापासून अनन्या म्हणत होती की, माझा वाढदिवस हटके साजरा झाला पाहिजे म्हणून! मग वेगळं काहीतरी म्हणून; नेहमी नेहमी महागडी *गिफ्ट* आणि जंगी *पार्ट्या* दिल्या म्हणजेच वाढदिवस साजरा झाला; हे जे तुमचं समीकरण झालंय ना, त्याला छेद द्यायचा असं मी ठरवलं. यामध्ये मला आईने आणि रजतने खूप मदत केली.''

''आज्जू, मामा तुम्ही पण?'' रडवेल्या चेहऱ्याने अनूने विचारलं. रजत मामा म्हणाला, ''अगं अनू, हो! मीच ताईला जंगल *थीमची* कल्पना दिली; पण ही तुझ्या वाढदिवसाचं गाणं म्हणणारी बच्चेकंपनी बोलवायचं *क्रेडिट* मात्र नंदिनीला दिलं पाहिजे बरं का!'' नंदिनी पुढे आली. अनुजवळ जाऊन तिला घट्ट मिठी मारत म्हणाली, ''अनु रडू नको बरं. आधी डोळे पुस. मी गेल्या दोन वर्षांपासून 'आनंदघरा'त या मुलांना चित्रकला शिकवायला जाते. 'आनंदघर' ही आईवडील नसलेल्या या मुलांना अगदी जीव लावून सांभाळणारी संस्था आहे. त्यांना असा वाढदिवस कधीच नाही बघायला मिळालेला. मागच्याच महिन्यात ही मुलं मला म्हणत होती, 'ताई आम्हालाही वाढदिवस कसा असतो ते एकदा पाहायचं आहे.' मग तुझ्या वाढदिवसाची वेगळी कल्पना ठरतेच आहे, म्हटल्यावर मी आत्याला विचारलं, यांना बोलावलं तर चालेल का? आत्यानेही लगेच परवानगी दिली.''

''अगं, पण मग तुझ्या वाढदिवसाला का नाही बोलावलंस त्यांना?'' अनन्या फणकाऱ्याने म्हणाली.

''कारण या संस्थेत जायला लागल्यापासून मी माझा वाढदिवस असा मोठा साजरा करणं बंद केलंय. आईबाबा दरवर्षी माझ्या वाढदिवसासाठी म्हणून काही रक्कम बाजूला काढतात. मग ती आम्ही खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवायचा प्रयत्न करतो,'' नंदिनी म्हणाली. ''म्हणजे तू तुझ्यासाठी काहीच नाही घेत? केकपण नाही कापत? *फ्रेण्ड्सना* घरी नाही बोलवत? तुला *गिफ्ट्स* नाही मिळत?'' अनन्या आणि तिच्या मैत्रिणी आश्चर्याने म्हणाल्या.



वार्षिक देणगीदार - • डॉ. नीरज रायते, पुणे • चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे
• श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

''नाही गं पोरींनो, तिचा वाढदिवस हे तिचे नवीन छोटे मित्रमैत्रिणी साजरा करतात. नंदिनीचे सगळे मित्रमैत्रिणीही हल्ली आनंदघरात जमतात. नंदिनी कधीच हे हवं, ते हवं म्हणून हट्ट करत नाही. उलट माझ्याकडे माझ्यावर प्रेम करणारं कुटुंब आहे, म्हणून देवाचे आभार मानते,'' अनूची आजी म्हणाली.

हे सगळं ऐकून अनन्या आणि तिच्या मैत्रिणी तर फारच आश्चर्यचकित झाल्या. काही क्षण शांततेत गेल्यावर अनन्याचे बाबा म्हणाले, ''बाळांनो, नंदिनी जे करतीये ते खरंच कौतुकास्पद आहे. ती ते मनापासून करते म्हणून सर्वांनाच ते आनंददायी ठरतं आहे. तिनं केलं म्हणून तुम्हीही असंच करावं, असं मात्र नाही; पण वाढदिवस म्हणजे नक्की काय आणि काय केलं म्हणजे तो साजरा होणार, याबाबतच्या तुमच्या कल्पना मात्र एकदा तपासून पाहा. आपण काहीही कमावत नसताना आईबाबांच्या जीवावर महागडी *गिफ्ट्स* देणं, अमुकच प्रकारे माझा वाढदिवस साजरा करा म्हणून हट्ट करणं, मिळालेल्या *गिफ्ट्सवरून* मैत्री *जज* करणं हे



मात्र नक्की पुनर्विचार करण्याचे मुद्दे आहेत, असं मला वाटतं.''

आजी म्हणाली, ''एक छोटीशी गोष्ट सांगते. आमच्या लहानपणी वाढदिवस वगैरे काही नसायचं. पण माझ्या एका जिवलग मैत्रिणीने एक महिनाभर स्वत: शिवणकाम करून, त्या वस्तू विकून पैसे कमावले. आणि त्यातून मला बरेच दिवसांपासून हवं असलेलं पुस्तक भेट म्हणून दिलं. किंमत किंवा प्रथमदर्शनी ते कितीही साधं वाटत असलं, तरी माझ्यासाठी ते अनमोल होतं. तुमच्या सध्याच्या वाढदिवस साजरा करण्याच्या या ठरीव साच्यात या भावना तुम्ही हरवत चालला आहात. भेटवस्तू काय आहे यापेक्षा ती देण्यामागची भावना जास्त महत्त्वाची असते. आपल्या जवळच्या व्यक्तीला काही भेट द्यायची म्हणून कष्ट करण्याची तयारी असावी लागते. मग ती भेट 'वस्तू' नसली तरीही चालते. म्हणजे आईबाबांच्या वाढदिवसाला म्हणून त्यांच्या रोजच्या कामातलं एखादं काम वर्षभर केलं तरी तीही त्यांच्यासाठी वाढदिवसाची भेट ठरू शकते... बघा विचार करून, माझं म्हणणं पटतंय का ते.'' आजीचं भलं मोठं समर्थन!

हे बोलणं ऐकताच अनू आणि तिच्या मैत्रिणी अगदी खजील झाल्या. पूर्वी रडत म्हणाली, ''सेजलला *गिफ्ट* द्यायला माझ्याकडे पैसे नव्हते आणि आई-बाबा एवढे पैसे द्यायला तयार नव्हते; म्हणून मी त्यांच्याशी खूप भांडले होते. शेवटी आजोबांशी खोटं बोलून *डोनेशन* द्यायला म्हणून ते पैसे घेतले होते. आज मला समजतंय की, मी किती वेड्यासारखं वागलीये ते. आजोबांशी खोटं बोलून पैसे घेतलेत ही गोष्ट तर मला आता फार जास्त सलतीये. मी खूपदा ठरवलं की आजोबांना सगळं सांगावं; पण खरं सांगून माफी मागायचं धाडस होत नव्हतं; पण आता

नॅशनल टेक्स्टाइलची स्थापना — इ. स. १९६८

स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

'इस्रो' (ISRO) ची स्थापना — इ. स. १९६९

वार्षिक देणगीदार - • सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका
• डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के. • डॉ. संजय गद्रे, धुळे

मी ठरवलं आहे, इथून घरी गेल्यावर मी लगेच आजोबांना सगळं खरं सांगून त्यांची माफी मागणार आहे. *थँक यू* आजी, तुम्ही सांगितलेल्या या गोष्टीमुळे माझे डोळे उघडले. खरंतर, तुम्हा सगळ्यांनाच *थँक यू* म्हणायला पाहिजे. तुमच्यामुळे आम्हाला असा वेगळा अनुभव घेता आला. आणि मला तर आता हेही समजलंय की, कोणतीही गोष्ट सगळे करतात म्हणून आपणही तशीच केली पाहिजे असं नाही. त्याबद्दल विचार करून आपल्याला जे योग्य वाटेल तेच आपण केलं पाहिजे.''

''वा! म्हणजे माझा हा प्रयत्न अगदीच वाया नाही गेला तर! हे सगळे बदल तुमच्यात लगेच होणार नाहीत; त्यादिशेने विचार आणि पुढे हळूहळू का होईना वाटचाल असा प्रवास तुम्ही नक्की करू शकाल.''

इतकावेळ विचारात गढून गेलेली अनन्या आईला बिलगत म्हणाली, ''आई, मलाही कळलं आहे, मी किती चुकीचा विचार करत होते ते. मीही इथून पुढे हे सगळं नक्की लक्षात ठेवीन आणि हो, मुख्य म्हणजे श्रेयाच्या वाढदिवसासाठी तुझ्याकडून घेतलेले पैसे मी खरंच 'स्व'-कमाई करून तुला परत आणून देईन.''

''अरे वा! आमची अनू खरंच मोठी झाली की आज! चला, आता सगळेजणं मिळून खाऊवर ताव मारू या.. *चिली* इडली आणि अनन्याचा आवडता मुगाचा शिरा!'' अनन्याचे बाबा उत्साहात म्हणाले. सगळ्यांनी भरपूर गप्पा मारत, मजा-मस्ती करत खाऊवर ताव मारला. आनंदघरातील मुलांनी चालवलेल्या *नर्सरीतील* एक-एक फुलझाड अनन्याने *रिटर्न गिफ्ट* म्हणून सगळ्यांना दिलं. आजच्या निमित्ताने प्रत्येकीच्या मनात रुजलेल्या नव्या विचारांचं जणू काही ते प्रतीक होतं. आनंदघरातील बच्चे कंपनीतील प्रत्येकाला अभ्यासासाठी लागणारं सगळं साहित्य भेट म्हणून दिलं. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून अनन्याला वाढदिवसाची सर्वोत्तम भेट मिळाल्यासारखं वाटलं... रात्री झोपताना अनन्या देवबाप्पाला म्हणाली, ''माझा प्रत्येक वाढदिवस मला असंच मोठ्ठं करणारा असू दे!''

**- अनादि अनंत**
anadibedekar19@gmail.com

**ऐकूया**
**कथा - गंध कुणाचा गेला सांगून**
**लेखन, वाचनस्वर - क्षितिज देसाई**

**बालकुमार मासिकांमधील साहित्याची झलक !**

**जुलै २०२१ च्या मासिकांमधील लेख**

| | | |
|---|---|---|
| १. | **किशोर :** नेहाची कमाल राधाची धमाल | - चंद्रकांत घाटाळ |
| २. | **ऋग्वेद :** कवितेची जन्मकथा (इंद्रजीत भालेराव : बाप) | - किरण डोंगरदिवे |
| ३. | **वयम :** कुठून येतात हे? | - प्रा. सुहास बारटक्के |
| ४. | **निर्मळ रानवारा :** आकांक्षांपुढे गगन ठेंगणे | - सचिन बेंडभर |
| ५. | **मुलांचे मासिक :** सरीवर सरी... आनंद उरी | - एकनाथ आव्हाड |
| ६. | **छात्र प्रबोधन :** तुलसी माहात्म्य! | - डॉ. कांचनगंगा गंधे |

(सोबतचा QR कोड स्कॅन करून वरील सर्व अंकांची झलक वाचा! आवडणाऱ्या मासिकांचे सभासद व्हा!)

**स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा**

भारत पाकिस्तान युद्धात भारत विजयी — इ. स. १९७१

पोखरण येथे भारताची पहिली यशस्वी अणू चाचणी — इ. स. १९७४

वार्षिक देणगीदार - • कै. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे • श्री. सागर सुराणा, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे

# हृदयस्पर्शी आठवणी!

– विजय जोरी

गणेशखिंडच्या विद्यापीठ बस थांब्यावर मी औंधकडे जाणाऱ्या *बसची* प्रतीक्षा करत उभा होतो. त्या दिवशी झालं असं होतं की, मी औंध *आयटीआयला* जाण्यासाठी गोखलेनगरच्या विद्यार्थी साहाय्यक समितीच्या ‘लजपत’ वसतिगृहातून सायकलवर निघालो होतो. एका पाव्हण्यानं दिलेली एटलसची जुनी सायकल होती माझ्याकडे! डागडुजी करून मी ती वापरत होतो. चतुश्रृंगी परिसरात पुन्हा एकवार सायकल *पंक्चर* झाली. पंक्चर काढण्याइतका वेळ आणि पैसेही नव्हते जवळ. वसतिगृहात मी इतर मुलांच्या सायकलची *पंक्चर* काढीत असे व हवा भरून देत असे, कपडे इस्त्री करून देत असे आणि सुटीच्या दिवशी गोखलेनगर व जनवाडीत घरोघरी जाऊन मिरची, मसाले, लोणची विकत असे. महिन्याभराच्या जेवणाचे सत्तर रुपये कसेबसे सुटायचे. त्यामुळे पैशांची वानवा कायम असायची. वेळ अशी होती की मागं फिरणं शक्य नव्हतं, तेव्हा संध्याकाळी घरीच पंक्चर काढायच्या इराद्याने मी सायकल रस्त्याच्या कडेला असलेल्या पानटपरीच्या आडोशाला सुरक्षित ठिकाणी उभी करून ठेवली अन् घाईघाईने चालत निघालो. *आयटीआयला* फारच मर्यादित सुट्ट्या असायच्या. तिथे उशीर अन् अनुपस्थिती चालत नसे. नियमांची पायमल्ली खपवून घेतली जात नसे. खरंतर अर्ध्या तासात मी चालत *आयटीआयला* पोहोचू शकलो असतो, अडीनडीला जातही होतो; पण उशीर होणार होता. चालत-चालत मी बस थांब्यावर आलो. खिसे चाचपून पाहिले, तर तिकीट काढण्याइतके देखील पैसे खिशात नव्हते. माझ्या आजूबाजूला शाळा *कॉलेजला* जाणारी काही पोरं उभी होती. काही पोरं बस थांब्याजवळून जाणाऱ्या सायकली व दुचाक्यांना अंगठा दाखवीत होती. काही गाड्या थांबत होत्या, त्यावर पोरं बसून जात होती. साऱ्याच गाड्या थांबत होत्या, असंही नाही. बहुदा पोरांच्या आणि गाडीवानांच्याही ते सवयीचं झालेलं असावं.



अंगठा दाखवण्याचा तो मूकसंकेत माझ्या खेडुतासाठी नवीन होता. मला तो फार मजेदार वाटला. पुण्यात मी फार नवखा होतो तेव्हा! १९८३ साली मी नुकताच शिक्षणासाठी पुण्यात आलो होतो. मी देखील प्रयत्न म्हणून त्या पोरांसारखं चार-दोन गाड्यांना अंगठा दाखवला. गाड्या नाहीच थांबल्या. मी निघणारच होतो, तेवढ्यात एक स्कूटर माझ्या दिशेनं येताना दिसली, मला



वार्षिक देणगीदार – • बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे • एक हितचिंतक, पुणे
• सौ. किरण मुसळे - कुलकर्णी, सातारा

हायसं वाटलं. आता मी वेळेत पोहचणार असं क्षणभर मनात आलं. पहिल्याच प्रयत्नात मी यशस्वी झाल्याचा आनंदही होता. स्कूटरजवळ येऊन थांबली. आनंदाच्या भरात मीदेखील सरसावलो. तेवढ्यात उजव्या हाताने डोळ्यावरचा चष्मा नाकावर ओढीत अन् माझ्यावर एक उपहासात्मक कटाक्ष टाकीत त्या माणसाच्या तोंडून अनपेक्षित शब्द बाहेर पडले, ''बापाची गाडी आहे का? लायकी नाय तर येता कशाला शहरात?'' अन् आणखी काही मर्मभेदी शब्द पुटपुटत अधिक वेळ न थांबता ते गृहस्थ निघून गेले.

उलटं-पालटं काही बोलण्याचा तर प्रश्नच नव्हता माझा. मला ते जमलंही नसतं. तेवढं अविवेकी धाडस नव्हतं माझ्यात. मात्र 'माफ करा हं' हे म्हणायलाही संधी मिळाली नाही मला. काळजाला घरं पाडणारे त्यांचे शब्दरूपी बाण माझ्या जिव्हारी लागले होते. माझे डोळे भरून आले. बस थांब्यावरील काही लोकांनी ती घटना टिपली, नकळत हसूही फुटलं काहींच्या ओठी.

मला माझीच लाज वाटली त्या प्रसंगात. अपमान तर झाला होताच माझा, माझ्या गरिबीचा. कुठून दुर्बुद्धी झाली असं वाटून गेलं. बस चे चार आणे वाचवण्याच्या फंदात हा महागडा आहेर पदरात पडला होता. गरिबी माझी ताकद होती. श्रम ही माझी निष्ठा होती. स्वाभिमानी वडिलांचा मुलगा होतो मी. लाचारी कधी जमलीच नव्हती; पण त्या दिवशी अनाहुतपणे माझ्याकडून चूक झाली होती. माझी गरिबी माझ्या पेहरावावरून उठून दिसत होती. गरिबाला रागावलं काय, सुनावलं काय, टिंगल-मस्करी केली काय, रीतच आहे श्रीमंतीची! मी निमूट *आयटीआयच्या* दिशेनं चालू पडलो. माझा तरी काय अधिकार होता त्या व्यक्तीला अंगठा दाखवण्याचा; ज्याचा माझा दूरान्वयानेही काही संबंध नाही, परिचय नाही.

या घटनेनं मी मात्र अंतर्मुख झालो. तो पहिलाच प्रसंग होता माझ्या जीवनातला, त्या दिवशी ही घटना घडली नसती तर, मला चुकीची सवय लागली असती. माझ्यात कृतज्ञतेऐवजी लाचारी आली असती. हिरमुसून चालणार नव्हतं. डोळे पुसायला जवळ कोणी नव्हतं. समजूत घालायला आक्का नव्हती. तेव्हा तत्क्षणी मीच माझी समजूत घातली. त्या दिवशी मी मनोमन ठरवलं, यापुढे लिफ्ट मागण्यासाठी कधीच कुणाला हात किंवा अंगठा दाखवायचा नाही; पण मदतीचा सहकार्याचा हात द्यायला कधी विसरायचं नाही. आणि पुढे मी ते कसोशीनं पाळलं. पुढे परिस्थिती बदलली; पण तो प्रसंग कायमचा आठवणींच्या कप्प्यात राहिला...

***

आता अशीच आणखी एक घटना! नववीत होतो मी. त्या वर्षी दिल्लीतील प्रजासत्ताक *परेडच्या* निवड चाचणीसाठी माझी शिफारस करण्यात आली होती. सांगायचं तात्पर्य; चाचणी पुण्यात होणार होती. सोबत कुणी नव्हतं. वय फार नव्हतं. भोर सरांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार मी एसटी बसनं प्रवास करून शिवाजीनगर बस स्थानकावर उतरलो. सरांनी काढून दिलेल्या नकाशाप्रमाणे चालत जवळच असलेल्या शेतकी महाविद्यालयात पोहोचलो. गावातील एकमेव वसंत औटी तिथे शिक्षण घेत



वार्षिक देणगीदार - • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

होता. मी थोडंफार त्याला ओळखत होतो. शोध घेता वसंताची गाठ पडली. सरांनी दिलेली चिठ्ठी वाचताना त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले. आनंदाच्या भरात त्याने मला मिठीत घेतलं. खूप आगत स्वागत केलं. संध्याकाळी सारसबाग, पेशवेपार्क दाखवलं. जेवू-खाऊ घातलं. मीही भारावून गेलो होतो.

त्याच्या वसतिगृहाजवळच ३६ एनसीसी महाराष्ट्र बटालियनचं कार्यालय होतं. कार्यालय बंद होण्याची वेळ झाली होती. तिथले प्रमुख अधिकारी श्री. डेबू घरी निघण्याच्या तयारीत होते. पन्नाशी ओलांडलेले खाकी सैनिकी वेशातले, ते मध्यम उंचीचे, सडपातळ, गोरेपान व्यक्तिमत्त्व आजही डोळ्यांपुढे तरळतंय. वसंतानं विनंती करत सरांनी दिलेलं पत्र त्यांच्या हाती ठेवलं. पत्र वाचता-वाचता ते पुन्हा खुर्चीत स्थिरावले. स्मितहास्य करीत खेड्यातून आलेल्या अर्ध्या चड्डीतल्या एका निरागस मुलाला शेकहँड करण्यासाठी ते उभे राहिले. म्हणाले,



''उद्या सकाळी ६ वाजता गणवेशात कार्यालयासमोर येऊन उभा राहा. मी तुला माझ्या स्कूटरवरून *परेड ग्राऊंडला* घेऊन जाईन.'' उशीर नको म्हणून मी सहाच्या आधीच पोहोचलो होतो, तेव्हा ते उच्चाधिकारी सद्गृहस्थ माझ्या आधी कार्यालयात माझी प्रतीक्षा करत होते. म्हसोबा गेट, जीपीपी, चतु:श्रृंगी, सेनापती बापट रोड, सिंबायोसिस, बालभारती अशा त्या प्रवासात प्रथमच गाडीवर बसलेला मी कावराबावरा होऊन पुण्याचं विहंगम दृष्य पाहात होतो. मला बटालियनच्या *परेड ग्राऊंडवर* सोडून डेबू साहेब परत माघारी फिरले. मी आश्चर्यानं पाहात राहिलो. नंतर मला कळलं ते फक्त मला *ग्राऊंडवर* सोडायला एवढ्या सकाळी आले होते. काय एकेक माणसं असतात...! केवढं माझं भाग्य...! सलाम त्या सैनिकाच्या मानव्याला!

आठवणी अशाच असतात! आपला ठसा मनपटलावर कायमचा उमटवूनच जातात, हृदयाच्या कप्प्यात घर करून राहतात...!

**कृष्णाकुमार ऊर्फ विजय जोरी**
vijaykumarjori@gmail.com

वाचा
ललित लेख - प्रिय ऋचास
लेखिका - लीला दीक्षित

**छात्र प्रबोधन मासिकाचे आजच सभासद व्हा!**
**सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
**या संकेतस्थळाला भेट द्या!!**
**(सवलत ३१ ऑगस्टपर्यंत लागू!)**

परम संगणकाची निर्मिती — इ. स. १९९०
भारताची गॅट करारावर स्वाक्षरी — इ. स. १९९१
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार - श्री. शिवप्रसाद आगटे, पुणे • श्री. अतुल जोशी, पुणे • गेझनर इंडिया प्रा. लि., पुणे

# अन्नाची भेसळ कशी ओळखाल?



१) आपल्याला **आइसक्रीम** खायला खूप आवडते. विविध प्रकारचे, चवींचे आइसक्रीम बाजारात उपलब्ध आहेत. कसे तयार करतात आइसक्रीम माहिती आहे? आपण खातो ते आइसक्रीम चांगले आहे ना? ते कसे ओळखाल? आइसक्रीमवर थोडासा लिंबाचा रस टाकून बघा. लिंबाचा रस टाकल्यावर आइसक्रीमवर फेसासारखे दिसले, तर आइसक्रीममध्ये धुण्याची पावडर (सोडा) आहे, असे समजावे.




२) रोजच्या स्वयंपाकात मग चहामध्ये, दुधामध्ये किंवा इतर पदार्थांत साखर ही आपण खातोच. खरंच, आपण **साखर** खातो का अजून काही? कसे बघू या! त्यासाठी एक चमचा साखर पाण्यामध्ये घाला. साखर जर का पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगत राहिली, तर ती खडूची पूड आहे, असे समजावे.



३) कापसाची वात मधामध्ये बुडवा आणि जाळण्याचा प्रयत्न करा. वात जर का लगेच जळाली नाही, तर तुम्ही मानवनिर्मित **मध** खात आहात असे समजावे!



४) तुम्ही सगळेजण रोज **दूध** पिता का? दूधामध्ये कुठल्याही प्रकारची भेसळ नाही, हे आपल्याला कसे सांगता येईल? यासाठी एक प्रयोग करू या. सम प्रमाणात दूध आणि पाणी एकत्र करा. असे केल्यानंतर, जर का फेस तयार झाला तर त्यात कपडे-भांडी धुण्याची पावडर आहे, असे समजावे.



५) रोज भाजीमध्ये टाकण्यासाठी आपण लाल तिखटाचा वापर करतो; पण ते खरंच **तिखट** आहे का नुसता रंग, असे आपण ओळखू या... एक चमचाभर लाल तिखट पाण्यामध्ये टाका. लाल तिखट जर का बनावट असेल तर त्यामधून रंग बाहेर टाकला जाईल.

अशी अजून काही उदाहरणे तुम्हाला माहीत आहे का? आई-बाबा, भावंडांबरोबर चर्चा करा.

(पूर्वप्रसिद्धी - छात्र प्रबोधन-सुबोध दिवाळी विशेषांक, श्रावण/ऑगस्ट २०१८)

**वाचा**
**विज्ञान माहितीपर लेख**
**कवक प्रसृष्टी**
**ले. पुरुषोत्तम जोशी**



वार्षिक देणगीदार - • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • श्री. नागेश साने, पुणे • श्रीमती लीला आचवल, नाशिक

# मी, यु-ट्यूब आणि माझा अभ्यास (भाग -२)

– प्रशांत दिवेकर

(लेखांक २)

तंत्रस्नेही अध्ययन कौशल्य

यु-ट्यूबने आपल्यासाठी माहिती, ज्ञान आणि करमणूक अशा वेगवेगळ्या चित्रफितींचा खजिनाच उपलब्ध करून दिला आहे. काय सापडत नाही यु-ट्यूबवर? आपल्याला मला तर मी शाळेत असताना पाहिलेल्या 'ब्योमकेश बक्षी' सारख्या मालिका, दूरदर्शन वर पाहिलेल्या भारतीय शिल्पकलेवरचे माहितीपट, जुनी व्याख्याने... किती सांगू अन किती नाही....

*यु-ट्यूबची* मजा ही आहे की, एखादी चित्रफीत तयार करून प्रकाशित करणं ही फक्त चित्रपट दिग्दर्शक वा निर्मात्याची मक्तेदारी राहिली नाही. आपण आपला *चॅनल* तयार करून; त्यावर आपण तयार केलेल्या चित्रफिती लोकांना बघण्यासाठी ठेवू शकतो. *यु-ट्यूबवर* वेगवेगळ्या प्रकारच्या चित्रफिती बघण्यासाठी उपलब्ध असतात. त्या चित्रफितींचे प्रकार आपण समजावून घेतले, तर आपण अभ्यासासाठी कोणत्या प्रकारची चित्रफीत शोधायची, पाहायची वा तयार करायची हे ठरवू शकतो; कारण प्रकारानुसार चित्रफिती पाहताना वा तयार करताना वेगळा विचार करावा लागतो. अर्थात वेगळे काहीतरी पाहिले, वेगळा विचार केला की, आपले वेगळ्या प्रकारचे शिक्षण होते.

**१. माहिती सांगणाऱ्या, समालोच किंवा भाष्य करणाऱ्या चित्रफिती :** यात माहितीपटापासून *व्हिलॉगपर्यंत* वेगवेगळ्या प्रकारच्या चित्रफिती उपलब्ध आहेत. या प्रकारच्या चित्रफिती माहिती प्रधान असतात. उदाहरण म्हणून गेल्या महिन्यात सुएज कालव्यात एक जहाज अडकले होते. आता याबद्दलचा अभ्यास करायचा असेल, तर आपल्याला कालव्याच्या बांधकामाबद्दल माहितीपट, कालव्यासाठी झालेल्या युद्धांच्या कथा, षडयंत्र, प्रत्यक्ष कालवा ज्यांनी बांधला त्यांच्याबद्दलचे जीवनपट, त्यांच्या मुलाखती, एखाद्या प्रवाशाने सुएज कालव्याच्या प्रवासात तयार केलेला *व्हिलॉग*, जहाज अडकल्यामुळे किती नुकसान झाले, त्यामुळे जगावर काय परिणाम झाला; याबद्दल तज्ज्ञांचे मत-विचार मांडणारे *व्हिडीओ* बघता येतील. या प्रकारामध्ये आपल्याला मुलाखती, गप्पा या स्वरूपात माहिती पोहोचवणारे *व्हिडीओ* उपलब्ध आहेत. खेळाडू, राजकारणी, वैज्ञानिक, सामाजिक कार्यकर्ते अशा विविध क्षेत्रांतील लोकांचे अनुभव याप्रकारात आपण पाहू शकतो.

**२. 'करून तर पाहा' :** या प्रकारच्या चित्रफिती एखादी कृती शिकण्यासाठी मदत करणाऱ्या, सूचना देणाऱ्या, त्याचे टप्पे दाखवणाऱ्या असतात. एखादी वस्तू कशी करायची, एखादा प्रयोग कसा करायचा, एखादे खेळणे कसे तयार करायचे, एखादा पदार्थ कसा तयार करायचा, एखादे चित्र कसे काढायचे अशा प्रकारांपासून ते आपल्याला अभ्यास करताना नकाशा कसा भरायचा, ते एखादी प्रतिकृती कशी तयार करायची, यांचे फक्त मार्गदर्शन करणाऱ्या नव्हे, तर टप्प्याटप्प्याने आपल्याकडून अभ्यास होईल याची काळजी अशा चित्रफिती तयार करताना घेतलेली असते. ख्रिसमस *लेक्चर* सिरीजसारख्या सादरीकरण प्रधान व्याख्यानमाला या प्रकारात आपल्याला शोधता येतील.

**३. मार्गदर्शन :** 'एखादी गोष्ट कशी करायची'



वार्षिक देणगीदार – • श्री. रवींद्र पालेकर, पुणे • श्री. राहुल भिडे, पुणे • सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे

याची प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या अनेक चित्रफिती 'unboxing,' 'gaming', 'प्रश्नोत्तरे' या प्रकारच्या चित्रफितीमध्ये उपलब्ध असतात. आपल्याला एखाद्या वस्तूची, उपकरणाची रचना समजून घ्यायची असेल आणि त्यावर आधारित प्रतिकृती तयार करण्याचा प्रकल्प करायचा असेल तर unboxing *चॅनल्स* शोधता येतील. एखादा खेळ शिकण्यासाठी *गेमिंग* प्रकारच्या चित्रफिती तुम्ही बघत असालच; पण तुम्ही तुमच्या चॅनलवर चांगल्या *चॅनल्सची प्लेलिस्ट* देवू शकाल किंवा *स्क्रीन रेकॉर्डर* वापरून एखादा छान *गेमिंग व्हिडीओ* तयार करू शकाल. एखादी गोष्ट आपण दुसऱ्याला समजावून सांगण्यासाठी करतो, तेव्हा ती आपल्याला देखील वेगळ्या पद्धतीने समजते. त्यामुळे अशा वेगवेगळ्या प्रकारच्या चित्रफिती तुम्ही तयार करू शकाल का? त्यासाठी तुम्हाला संहिता लेखन आणि संकलनाची तंत्रे आणि *अॅप्सची* ओळख करून घ्यावी लागेल.

**४. उत्तम/आवडते/लोकप्रिय :** संकलन-गुणांकन



इतिहासाचा अभ्यास करताना दुसऱ्या महायुद्धावरील दहा उत्तम चित्रपट, खेळाचा अभ्यास करताना क्रिकेटमधील दहा सर्वोत्तम झेल, विज्ञान-तंत्रज्ञानाचा अभ्यास करताना जगातील महत्त्वाचे पंचवीस तंत्रज्ञान शोध अशा प्रकारचे संकलन केलेल्या अनेक चित्रफिती उपलब्ध आहेत. या चित्रफितीमध्ये रसग्रहणात्मक आणि गुणात्मक निकषांवर माहितीचे संकलन केलेलं असतं. अनेक चित्रफितींमध्ये एखादी कलाकृती कशी तयार केली, एखादा प्रवास कसा केला याचे अनुभव देखील सांगितलेले असतात.

**५. विनोद/उपहास :** 'आज तक' वा 'इंडिया टुडे'च्या *यु-ट्यूब चॅनल्सची* त्या आठवड्यातील राजकीय घटनेवर आधारित अनेक *पॉलिटून्स* तुम्ही पाहू शकाल. एखाद्या गोष्टीचे, घटनेचे, प्रसंगाचे थोडे विनोद ते उपहासाच्या अंगाने जाणारी मांडणी अशा चित्रफितींमध्ये असते. या प्रकारची मांडणी समजावून घेताना घटना, प्रसंग, व्यक्तीचे कार्य ही माहिती असावीच लागते वा माहिती होते; पण त्याचे महत्त्व समजून घेण्यासाठी माहिती आणि विश्लेषणापलीकडे जावे लागते. याचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत *स्कीट* (प्रहसन), *पॅरडी* (विडंबन), *प्रँक* (उपहास), *रोस्टीग*, *मिम्स* इ.

**६. प्रतिसाद :** एखाद्या पुस्तकाचा परिचय, संस्थेचा परिचय याप्रकारच्या अनेक चित्रफिती आपण माहितीपट या प्रकारात शोधू शकतो; पण त्यांची समीक्षा करणे, त्यांचे रसग्रहण करणे अशा प्रकारच्या चित्रफितींमध्ये तो तयार करणारा त्याचे मत मांडत असतो, त्याची चिकित्सा करत असतो, परीक्षण करत असतो. कदाचित काही प्रसंगी त्याची खिल्लीपण उडवतो. अशा चित्रफिती 'लोकं 'स्व'मत कसे मांडतात' याची

५ अणु चाचण्या घेऊन भारत अणवस्त्र सज्ज — इ. स. १९९८
कारगिल युद्धात भारताचा विजय — इ. स. १९९९
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार - • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे
• डॉ. विकास हरताळकर, चोपडा, जि. जळगाव

ओळख करून घेण्यासाठी उपयोगी पडतात. आता भाषा, समाजशास्त्र विषयांमध्ये अशा प्रकारचे प्रश्न असतात. या प्रकारांबरोबर आपण चित्रफितीत खालील *कॉमेंट्स* वाचू शकतो, आपले मत *कॉमेंट्समध्ये* मांडू शकतो. अशा चित्रफितीत *यु-ट्यूबवर* शोधायच्या असतील तर आपल्या अभ्यासाच्या विषयातील संकल्पनांची शीर्षके आणि सारशब्दाबरोबर खालील सारशब्द जोडून *सर्च* केल्यास तुम्हाला चांगले अभ्यास साहित्य *यु-ट्यूबवर* सापडू शकेल.

**सारशब्द यादी :** Commentary, Product Reviews, How it works, Tutorials, Top Lists, Challenges, Reactions, Q&A, Interview, Docuseries, Gaming, unboxing, vlog, favourites, parody, memes, reactions, sketch video, pranks etc. आपल्या अभ्यास विषयाचा आशय शोधण्यासाठी म्हणजेच स्वाध्यायासाठी आपण जसे *यु-ट्यूब* वापरू शकतो; तसे आपण कसा अभ्यास केला, किती अभ्यास केला, असा आपल्या अभ्यासाचा 'अभ्यास' करण्यासाठी याच्या *सेटिंगमध्ये* आपण किती 'वेळ' आणि '*डेटा*' घालवला, यावर याचा हिशेब आपल्याला मिळतो. आपण कायकाय शोधले याचा इतिहास मिळतो. आपण नेमकं कायकाय बघितलं त्याची यादी मिळते. असा *यु-ट्यूबमधील* आपल्या वापराचा हिशेब ठेवणाऱ्या नोंदींमधून आपण अभ्यासासाठी, ज्ञान मिळवण्यासाठी आणि फक्त करमणुकीसाठी किती वेळ सत्कारणी लावला, किती वाया घालवला यावर विचार केल्यास आपल्याला आपल्या *स्क्रीन टाइमचे* चांगले नियोजन करता येईल.

परत शाळा सुरू होईपर्यंत व आता कायमच आपल्याला ही नवीन अभ्यासाची साधने वापराची असल्यामुळे, ती अधिक प्रभावीपणे कशी वापरूयात; हे या लेखमालेतील पुढील लेखात आपण माहिती करून घेवू.

**– प्रशांत दिवेकर**
विभाग प्रमुख – शैक्षणिक उपक्रम संशोधिका,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

बुद्धीला खुराक

## उपसर्गाने बदलतो अर्थ

आपण मराठीमध्ये अ, अव, अप, उद्, नि, सु असे अनेक उपसर्ग (prefix) नामांना, क्रियापदांना नेहमी लावतो. या छोट्याशा उपसर्गामुळे मूळ नामाचा, क्रियापदाचा अर्थ बदलत जातो. बघा कसं ते!

यासाठी आपण संस्कृतमधली काही क्रियापदे पाहूया. उपसर्ग लावून त्यापासून जी नामं तयार होतात ती तर आपण मराठीतही वापरतो. बघा –

१) **'गम' या संस्कृत धातूचा अर्थ 'जाणे.'**

गच्छन्ति – जाणे
आगम – येणे
निर्गम – बाहेर जाणे
संगम – एकत्र येणे
उद्गम – वर येणे

२) **'धा' या संस्कृत धातूचा अर्थ 'ठेवणे.'**

अंतर्धान – नाहीसे होणे
संधान – रोखून धरणे
संविधान – व्यवस्था ठेवणे
परिधान – वस्त्र पांघरणे, घालणे
व्यवधान – लक्ष असणे

३) **'क्रम'** या संस्कृत धातूचा अर्थ 'चालणे, पुढे जाणे.'


आक्रमण – चढाई करणे
पराक्रम – शौर्य, लढाईतले कौशल्य
अतिक्रमण – ओलांडणे
संक्रमण – बदल होणे, अवस्था बदलणे

असे काही उपसर्गामुळे होणारे बदल तुम्हाला लक्षात येतात का, ते पाहा बरं.

प्रतिभा पाटील या पहिल्या महिला राष्ट्रपती — इ. स. २००७
श्रीहरीकोटा येथून चांद्रयान १ चे यशस्वी प्रक्षेपण — इ. स. २००८
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – • डॉ. वर्षा बखले, चेंबूर, मुंबई • सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई
• कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे

# ओळखा पाहू, चित्रात दडलेल्या म्हणी...



**चि. कृष्णा बोर्डे** (इ. ७ वी), जवाहरनगर, अकोला **हस्तलिखित –** स्वप्नपूर्ती
(उत्तरे अन्यत्र)

# कागदाचा पेंग्विन



**साहित्य :** फुगा, वर्तमानपत्राचे कागद, *कार्डशीट* पेपर, पुठ्ठा, पातळ डिंक/पातळ खळ, डोळे (गुगली आईज) किंवा टिकल्या, जलरंग *(वॉटर कलर)*, उपलब्ध रंग साहित्य, पॉलिश पेपर.

**कृती : १.** प्रथम मध्यम आकाराचा फुगा फुगवून घ्या.


२. त्यावर वर्तमानपत्राच्या कागदाचे तुकडे पातळ डिंकाच्या किंवा पातळ खळीच्या साहाय्याने चिकटवून घ्या. कागदाचा तुकडा चिकटवत असताना पहिल्या चिकटवलेल्या कागदावर दुसऱ्या कागदाचा काही भाग यावा. अशाप्रकारे वर्तमानपत्राचे ५ ते ६ थर सम पातळीत फुग्यावर चिकटवून घ्या. त्यानंतर तयार झालेला आकार उन्हामध्ये चांगला सुकवून घ्या.

३. आकार व्यवस्थित सुकल्यानंतर टाचणीच्या साहाय्याने आकारातील फुगा फोडा, *पॉलिश पेपरच्या* साहाय्याने तयार झालेला आकार घासून घ्या.

४. एका *कार्डशीट पेपरवर* पेंग्विनची चोच, पंख, हात आणि पायाचा आकार काढून घ्या. हे काढलेले आकार कात्रीच्या साहाय्याने व्यवस्थित कापून घ्या आणि आकृती ४ मध्ये दाखविल्याप्रमाणे योग्य ठिकाणी हे आकार चिकटवा.

तयार झालेल्या आकाराला जलरंगाचा वापर करून आकर्षक रंगवा. चेहऱ्यावर योग्य पद्धतीने डोळे चिकटवून घ्या. पेंग्विन सुस्थितीत उभा राहण्यासाठी खालील बाजूला गोलाकार पुठ्ठा चिकटवा.

वरील कलाकृती तुम्ही *शो-पीस* म्हणून ठेवू शकता किंवा *मनीबँक* म्हणूनही वापरू शकता. त्यासाठी पेंग्विनच्या वरील बाजुस नाणे जाईल एवढा छेद घ्यावा व खालील बाजूस गोलाकार आकार कापून पुठ्ठा चिकटवा म्हणजे तुमची छोटी *मनीबँक* तयार!




करून पाहा
कागदी हंस

**– तुकाराम पाटील**
खेर्डी-चिंचघरी (सती), ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
(पूर्वप्रसिद्धी – छात्र प्रबोधन-सुबोध दिवाळी विशेषांक, कार्तिक/ऑक्टोबर २०१८)

आंध्रप्रदेशातून तेलंगणा या स्वतंत्र राज्याची निर्मिती | इ. स. २००९
प्रत्येक नागरिकाला स्वत:ची ओळख देण्याच्या हेतूने आधार कार्ड योजना | इ. स. २०१०
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – • श्री. अनिल रिसबूड, पुणे • श्री. संतोष साटम, पुणे • श्री. रवींद्र बांडे, शिवापूर, पुणे


## छात्र प्रबोधन नूतन संपादक मंडळ सदस्य - संक्षिप्त परिचय



**आश्लेषा महाजन -** आश्लेषाताईंनी कवयित्री, लेखिका म्हणून गेली सुमारे २२ वर्षे छात्र प्रबोधनमधून कुमारांसाठी वैविध्यपूर्ण लेखन केले. तसेच कुमारांसाठी आयोजित केलेल्या लेखन, अभिवाचन कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून सहभागी! विविध वृत्तपत्रांमधून सातत्याने लेखन, आकाशवाणी, दूरदर्शनसाठी लेखन व सादरीकरण! छात्र प्रबोधनच्या **संपादक मंडळात ऑगस्ट २०११ पासून सक्रिय सहभाग.** त्यांनी अनेक लेखकांना लिहिते केले, जोडून घेतले. आतापर्यंत ३७ पुस्तके प्रकाशित. पाठ्यपुस्तकातही त्यांचे साहित्य समाविष्ट झाले आहे. यापुढेही संपादक मंडळात त्यांचा क्रियाशील सहभाग असेल.




**डॉ. कांचनगंगा गंधे -** वनस्पतिशास्त्र विषयात अभ्यासपूर्ण व्याख्याने, वर्तमानपत्रातून लेख-लेखमाला, आकाशवाणी पुणे केंद्रावर भाषणे प्रसारित. कुमारांमध्ये विज्ञानविषयक गोडी निर्माण होण्यासाठी, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी अतिशय लालित्यपूर्ण, सुलभ पद्धतीने छात्र प्रबोधनमधून सुमारे २५ वर्षे विज्ञानविषयक लेखन. छात्र प्रबोधनच्या **संपादक मंडळात ऑगस्ट २०११ पासून सक्रिय सहभाग.** विज्ञान लेख लिहिणाऱ्या अनेकांना त्यांनी छात्र प्रबोधनशी जोडून घेतले. यापुढेही संपादक मंडळात त्यांचा क्रियाशील सहभाग असेल.



**मल्हार अरणकल्ले -** ज्येष्ठ पत्रकार आणि ललित लेखक. सुमारे चार दशकांहून अधिक काळ पत्रकारितेत. पत्रकारितेतील मानाचे पुरस्कार प्राप्त. 'सकाळ' व 'सकाळ साप्ताहिक'चे माजी संपादक. छात्र प्रबोधनसाठी सुमारे वीस वर्षे ललित लेखन व अनेक उपक्रमांत सक्रिय सहभाग. **१ ऑगस्ट २०२१ पासून छात्र प्रबोधनच्या संपादक मंडळात उत्साहपूर्ण प्रवेश!** त्यांचे मन:पूर्वक स्वागत!!



**स्वाती ताडफळे -** ३१ वर्षे माध्यमिक स्तरावर अध्यापन, शालेय व सहशालेय अनेक उपक्रम व प्रकल्प यात सहभाग. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे इ. ७ वी ते १० वीपर्यंतच्या मराठी भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तक संपादनात अभ्यासगट सदस्य म्हणून काम. **१ ऑगस्ट २०२१ पासून छात्र प्रबोधनच्या संपादक मंडळात उत्साहपूर्ण प्रवेश!** त्यांचे मन:पूर्वक स्वागत!!



**छात्र प्रबोधन संपादक मंडळ - भूतपूर्व सदस्य : नीलिमा करमरकर -** छात्र प्रबोधन मासिकाच्या **संपादक मंडळात गेली १८ वर्षे नीलिमाताईंचा आत्मीयतेने सहभाग आहे.** त्यांनी विद्यार्थ्यांसाठी अनेक स्पर्धांचे आयोजन आणि परीक्षण केले. विविध क्षेत्रांतील प्रेरणादायी व्यक्तींच्या जडणघडणीच्या कहाण्या सांगणाऱ्या 'आयुष्यातील वादळलाटा', 'आम्ही असे घडलो', 'आमची जडणघडण' या ३ पुस्तकांचे संपादन चिकाटीने व उत्साहाने केले. या टप्प्यावर काही वैयक्तिक कारणामुळे संपादक मंडळातील सदस्य म्हणून काम करण्याचे त्या थांबवणार आहेत. असे असले तरी, छात्र प्रबोधनला त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा यापुढेही उपयोग होत राहील, हा विश्वास आहेच! **छात्र प्रबोधनमधील योगदानासाठी नीलिमाताईंविषयी आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो व त्यांना स्वास्थ्यपूर्ण आरोग्यासाठी शुभेच्छा देतो!**



**शैलजा देशमुख - मानद संपादक : परिचय -** छात्र प्रबोधन मासिकाच्या प्रारंभापासून म्हणजे **ऑगस्ट १९९२ पासून सक्रिय सहभाग, संपादक मंडळातील क्रियाशील सदस्य. ऑगस्ट २०१६ पासून मानद संपादक** म्हणून कार्यरत! छात्र प्रबोधनच्या कुमारवयोगटासाठी अनेक सिद्धहस्त लेखकांना लिहितं करण्यासाठी पुढाकार. कुमारांना वाचनाची गोडी लागावी व साहित्याची आवड निर्माण व्हावी म्हणून विशेष प्रयत्न केले. छात्र प्रबोधन मधून कथा, ललित, रसास्वादात्मक लेख यांसारख्या साहित्य प्रकारांचे विपुल प्रमाणात लेखन. छात्र प्रबोधनच्या साहित्यामधून ३ पुस्तकांची निर्मिती व २ पुस्तकांचे संपादन केले. अनेक स्पर्धा, उपक्रम व कार्यशाळांमध्ये परीक्षक व मार्गदर्शक!!

लोकपाल विधेयकाला लोकसभेत मंजुरी | पहिली आंतरराष्ट्रीय जैव विविधता परिषद हैदराबाद येथे संपन्न

इ. स. २०११ | स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा | इ. स. २०१२

वार्षिक देणगीदार - • श्री. शरद पालकर, पुणे • श्री. अजय घाणेकर, पुणे • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे

# कवितेतला पाऊस! ललित

– शैलजा देशमुख



पाऊस! तप्त उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तनामनाला शांतवणारा...!

पावसाळ्याच्या आगमनाची वर्दी देणारा वळीवाचा पाऊस...!

पृथ्वीच्या सर्जनशीलतेला जाग आणणारा धुवाँधार पाऊस!

कधी सतत लागून राहिलेला झडीचा पाऊस!

कधी अतिवृष्टीने आपले संहारक रूप दाखवणारा प्रलयंकारी पाऊस!

तर कधी रस, रूप, गंधाची उधळण करणारा, इंद्रधनुष्याचे सप्तरंग जीवनात आणणारा पाऊस!

समृद्धी घेऊन येणारा जीवनदायी पाऊस!

पावसाची अशी नाना रूपे! प्राचीन काळापासून कवींच्या मनाला मोहवीत राहिली यात नवल ते काय?

ग्रीष्म ऋतूत एखाद्या दिवशी प्रचंड उकाडा जाणवत असतो. पण मधूनच ओलसर वाऱ्याची झुळूक कुठूनतरी पावसाची ललकारी देत येते. अचानक काळोखी दाटून येते. सर्वजण वाट पाहात असलेला पहिला पाऊस येऊन धडकतो.

*ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा*
*पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा!*

असं फारसं अर्थ नसलेलं; पण लयदार बडबडगीत गात लहान मुलं 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या' खेळत मनसोक्त पावसात भिजतात. ही आपली पावसाशी झालेली पहिली शब्दभेट! पावसात ओलंचिंब व्हायचं, गारा वेचायच्या, त्यांचा थंडगार स्पर्श तोंडात घोळवायचा हा आनंददायी अनुभव **शांताबाई शेळके** यांच्या पुढील काव्यपंक्तीत किती स्वाभाविकपणे व्यक्त होतो पाहा –

*पाऊस आला, वारा आला*
*पान लागले नाचू*
*थेंब टपोरे गोरे गोरे*
*भरभर गारू वेचू*

खेड्यामध्ये पावसाचे आगमन झाले की, बेडकांचा आवाज येऊ लागतो. **ग. ह. पाटील** यांच्या कवितेत एक बालक त्या बेडकाशी थेट मैत्री साधत मिष्किल सवाल करतो –

*डरॉव डरॉव बेडूकराव*
*पत्ता तुमचा नव्हता राव*
*कोठून आला सांगा राव*

लहानपण सरतं, आपण शाळा–कॉलेजात जातो तेव्हाही पाठ्यपुस्तकातून पावसाच्या कविता अधिक प्रगल्भ रूपात भेटत राहातात.

*माऊलीच्या दुग्धापरी*

भारतीय महिला बँक – पूर्णत: महिलांद्वारे चालवलेल्या बँकेची सुरुवात — इ. स. २०१३
आंतरराष्ट्रीय योगदिवस म्हणून साजरा करण्यास सुरुवात — इ. स. २०१५
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – ▪ श्री. तन्मय बुडुख, सिॲटल, अमेरिका ▪ श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई ▪ असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे

*आले मृगाचे तुषार*
*भुकेजल्या तान्ह्यासम*
*तोंड पसरी शिवार*

यासारख्या **माडगूळकरांच्या** कवितेतून उन्हाळ्यात तापलेलं शेत-शिवार पावसाच्या थेंबांनी भिजतं, हे दृश्य डोळ्यांसमोर साक्षात उभं राहतं. त्याचबरोबर शेत म्हणजे भुकेजलेलं बाळ आणि पावसाचे थेंब म्हणजे आईने पाजलेलं दूध या कल्पनेतून उपमा अलंकाराची सहज सुंदर ओळख होते. तर पाऊस पडून गेल्यावर त्यांना भावलेले पृथ्वीचे प्रसन्न रूप -

*स्नान झाले धरणीचे*
*पडे सोन्याचा प्रकाश*
*आता बसेल माऊली*
*अन्नब्रह्माच्या पूजेस*

या ओळीतून उभे करताना पावसानंतर येणाऱ्या समृद्धीची चाहूल लागून, मन अधिकच प्रसन्न होतं!

आभाळात ढग जमू लागतात. गडद निळ्या पाण्यानी संपृक्त ढग पाऊस घेऊन येतात. ते ढग म्हणजे जणू शांत, शीतल स्वभावाचे, चपळ असे वाऱ्याचे सैन्य आहे. अशी कल्पना कवी **बा. भ. बोरकरांना** सुचते.

*गडद निळे, गडद निळे जलद भरूनी आले*
*शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले...*

या कवितेतील अक्षरांच्या पुनरावृत्तीने प्राप्त झालेले नादसौंदर्य जाणवते.

पाण्याने ओथंबलेले संपृक्त ढग आकाशात दिसतात; तेव्हा त्यांच्या विविध छटा **बालकवींच्या** मनाला वेडावून टाकतात आणि त्यातून उमटते ते आकाशातील अनेकरंगी मेघांचे सुंदरसे चित्र...

*थबथबती ओथंबून खाली आली*
*जलदासी मज दिसली सायंकाळी*
*रंगही ते नच येती वर्णायाते*
*सुंदरता मज त्यांची भुलवी चित्रा*

त्या ढगांच्या सौंदर्याचं वर्णन करताना, 'त्यांच्या रंगाचं वर्णन मला करता येत नाही,' असं म्हणता म्हणता त्यांचे रंग त्यांच्या मन:चक्षूंना दिसतातच -

*फिकट निळीने रंगवलेला कापूस मेघांचा*
*वरूनी कुणी गुलजार फिरवला हात कुसुंब्याचा*
*त्यातही हसली मंदपणे ती चंद्रकला राणी*
*कडेकडेच्या मेघांवर ये मोत्याचे पाणी*
*इंद्रनिळीचा रंग बहरवी गिरीच्या अंगाला*
*मधुन जळाची शुभ्र शोभे ती मोहनमाळा*
*चौबाजूला थाट दाटला हा हिरवाळीचा*
*सृष्टीसतीने साज घातला पाऊसकाळीचा*

आकाशतले विविध रंगी ढगाची वस्त्रे, ढगातून डोकावणारी नाजूक फिकी चंद्रकोर, निळ्याशार डोंगरांच्या गळ्यातील झऱ्यांचे मोहनमाळीसारखे हार, चहूबाजूची हिरवळ हा जणू सृष्टीने चढवलेला साजशृंगार आहे, असे बालकवींच्या कवीमनाला भासते.

हिरव्यागार गालिच्यांवर फुललेली फुले पाहून बालकवींची 'फुलराणी' जन्माला येते. इंदिरा संतांना रंग रंगुल्या, सानसानुल्या गवतफुलांचा लळा लागतो. ढग पाहून त्यात लहान मुलांना हत्ती, मांजर, वाघ, जिराफ असे आकार दिसू लागतात. ***संजीवनी बोकिलांना*** तर त्यात घाबरट, निरागस छकुला दिसतो.

*काळाकुट्ट मोठा ढग*
*फिरून आला सारे जग*
*पाहूनी घेतले नाना देश*
*वेगवेगळे त्यांचे वेश*
*हिरवी झाडे समुद्र निळे*
*सारे जग त्यास पहावया मिळे*

डिजिटल इंडिया ही मोहीम भारत सरकारने सुरू केली — इ. स. २०१५

नीती (NITI) आयोगाची स्थापना — इ. स. २०१५

स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार - • डॉ. अभय व डॉ. वीणा लिमये, पुणे • श्री. अजय फाटक, पुणे
• कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे

*वाटेत मोठ्ठा डोंगर आला*
*'तिकीट पाहू' असे म्हणाला*
*ढग गेला पार घाबरून*
*डोळ्यात पाणी आलं भरून*
*ढसाढसा रडू लागला*
*लोक म्हणाले, 'पाऊस आला'*

खरंच, पावसाच्या जन्माची ही रम्य कल्पना किती विस्मयचकित करून टाकणारी आहे!

इथल्या मातीशी, निसर्गाशी नातं सांगणाऱ्या **बहिणाबाईंना** हा पाऊस कसा दिसतो, हे पुढील ओळीत पाहू या...

*आला पह्यला पाऊस*
*शिंपडली भुई सारी*
*धरित्रीच्या परिमय*
*माझं मन गेलं भरी*

*आला पाऊस पाऊस*
*आता सरींवर सरी*
*शेत शिवार भिजले*
*नदी नाले गेले भरी*

*आला पाऊस पाऊस*
*आला ललकारी ठोकत*
*पोरं निघाले भिजत*
*दारी चिल्लया मारीत*

हळूहळू पावसाची संततधार सुरू होते. धुवाँधार पावसाच्या सरी कोसळू लागतात. त्या निसर्गदृश्यात कवी **बा. भ. बोरकरांसारख्या** सौंदर्यप्रेमी रसिकमनासमोर गोकुळातील कृष्णकन्हैय्या आणि गोपी यांची रासक्रीडा सजीव होते.

*सरीवर सरी आल्या*
*सचैल गोपी न्हाल्या गं*
*गोपी झाल्या भिजून चिंब*
*थरथर कापति निंब-अदंब*



*घनामनातुन टाळ मृदुंग*
*पाने पिटिती टाळ्या गं*
*सरीवर सरी आल्या गं*

अशा शब्दांत पावसाच्या सरी भावमग्न गोपी बनून येतात. पावसाचा, पावसातील वाऱ्याचा, वाऱ्याबरोबर हिंदकाळणाऱ्या झाडांचा, वेलींचा, पानांचा आवाज मनात घुमू लागतो. आपण नेहमी अनुभवत असलेला पाऊस बोरकरांच्या कवितेत नाद, रूप, रंग, स्पर्श घेऊन शब्दाशब्दातून झरतो.

टपटपणाऱ्या पावसाच्या थेंबांच्या आवाजात **संगीता बर्वे** यांना मल्हाराची धून ऐकू येते. त्या म्हणतात –

*पानावरती थेंब वाजती*
*मातीमधुनी कोंब पुढे*
*नाजूक इवल्या चोचींतून अन्*
*मल्हाराची धून उठे*

पावसाळ्यात फुललेल्या, चिंब भिजलेल्या

GST विधेयकाला मंजुरी — इ. स. २०१६
पाकव्याप्त काश्मिरमधील आतंकवादी लाँचपॅडस्वर सर्जिकल स्ट्राईक — इ. स. २०१६
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – • डॉ. जयेश राहाळकर, पुणे • श्री. सुभाष माळी, पुणे
• 'संतुल' उद्योजक, श्री. मिलिंद संत, पुणे

निसर्गाची मुक्त चित्रं **ना. धों. महानोरांच्या** कवितेत जागोजाग भेटत राहतात. पावसाचा आवाज, पावसाचा घनगर्द स्पर्श, आभाळाचे रंग, रानाचा गंध हे सगळे त्यांना 'पंचेद्रियांनी जाणवते!'

*पक्ष्यांचे लक्ष थवे*
*गगनाला पंख नवे*
*वाऱ्यावर गंधभार*
*भरलेले ओचे*
*झाडातून बदबदेल*
*बहर कांचनाचे*
*घन वाजत वाजत ये*
*थेंब अमृताचे*

ही महानोरांची कविता लयकारीचा उत्कृष्ट नमुना आहे. पहिल्या दोन ओळीत पावसाशी ढगांचा खेळ आहे. मधल्या ओळींमध्ये मोहक निसर्गदृश्ये आहेत आणि शेवटच्या एकाच ओळीत पृथ्वीवर पावसाच्या थेंबाचा, 'अमृता'चा चहूकडे वर्षाव होण्याचे वर्णन आहे.

सतत कोसळणारा पाऊस कधी रौद्र रूप धारण करतो. अशा संहारक पावसाचे, त्याच्या अवघ्या चराचरावर होणाऱ्या परिणामांचे चित्र **ग. दि. माडगूळकर** यांनी 'अतिवृष्टी' या कवितेत उभं केलंय

*आले झाकोळून नभ, ओते सारखा पाऊस*
*क्षण नाही उघडीप, आभाळाच्या आक्रोशास*

सर्वत्र शांतता पसरलीय, आकाशात सूर्य नाही, पाहावे तेथे जलवर्षाव त्या जलवर्षावाच्या परिणामांचे वर्णन पुढील ओळीत येते.

*आली फुगून सरिता*
*लांब उन्मत्त जाहली*
*सारा गाव घशाखाली*
*आणि कधीतरी पुन्हा*
*बाळ गुराखी येथले*
*बोलतील आपसात*
*'इथे गोकुळ बुडाले...!'*

आषाढात घनगर्द पाऊस कोसळून जातो आणि एकेदिवशी सकाळ चक्क सोनेरी उन्हानेच उजाडते, सगळ्या विश्वाला उमगते, अरे, हा तर श्रावण! रानं हिरवीगार होतात, क्षणात उन्ह-पावसाचा खेळ सुरू होतो. मन आनंदित होतात. श्रावणगाणी निसर्गातून साद देतात, तर सण-उत्सवांच्या निमित्ताने पोरीबाळींच्या तोंडून उद्गारतात!

*श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे*
*क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनि ऊन पडे*

या वातावरणाचे वर्णन करणारी बालकवींची कविता सर्वश्रुत आहेच ते म्हणतात–

*आला आषाढ श्रावण*
*आल्या पावसाच्या सरी*
*किती चातक चोचीने*
*प्यावा वर्षाऋतू तरी*

अवखळ श्रावणाचे अत्यंत नादमय चित्र **इंदिरा संत** रेखाटतात. नाट्यमय अशी अनुप्रासात्मक रचना हे या कवितेचे वैशिष्ट्य!

*उन्हाचे पाटव नेसले टाकले*
*वाऱ्याचे पैंजण घातले फेकले*
*घातले, धुतले डोळ्यात काजळ*
*लावले पुसले केवडा अत्तर*
*बांधले सोडले हिंदोळे हर्षाचे*
*हासले रूसले मयूर मनाचे*
*श्रावणा कुणाचे मनस्वी हे क्षण*
*निसर्गचित्रात पावले स्पंदन?*

एखादी अवखळ तरूणी शृंगार करताना जसा नखरा करते, तोच कवयित्रीला श्रावणातल्या निसर्गात दिसतो. उन्हाचं वस्त्र, वाऱ्याचे पैंजण,


वार्षिक देणगीदार – • डॉ. विनायक देसूरकर, पुणे • कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे
• श्री. अनंत बेडेकर, वाई, जि. सातारा

मधूनच येणाऱ्या काळ्या ढगांच्या किनारीचे काजळ, वातावरणात पसरलेल्या फुलांचा सुगंध अशा श्रावणातील निसर्गचित्रातून कवयित्रीला मनस्वी स्पंदने ऐकू येतात.

गावच्या संस्कृतीत वाढलेल्या **सदानंद देशमुख** यांच्या कविमनाला पावसाच्या सौंदर्याबरोबरच शेतकऱ्यांचं पाण्याशी असलेलं नातं स्मरतं

*चिंब भिजल्या रानात*
*वाहे तृप्ततेची लाट*
*खेळ खेळतो हा आम्ही*
*इथे रेखले ललाट*

इथल्या शेतांमध्ये सोनं पिकलं तर तृप्ती ओसंडून वाहते.

कधीकधी सतत, अविरत कोसळणारा पाऊस सामान्य माणसालाच नव्हे, तर कविमनालाही अस्वस्थ करतो.

*पाऊस चौफेर आत नि बाहेर*
*पावसाचा ऊर दुभंगला!*
*पाऊस कणात, पाऊस क्षणात*
*पाऊस मनात, ओसंडला!*

असा ओसंडून वाहणाऱ्या पावसाचा आवाज सर्वत्र भरून राहतो,

*त्रिखंडात आज पावसाची गाज*
*पावसाचा... षड्ज नाद वाहे!*

असा सूरमयी पाऊस **सुधीर मोघे** यांच्या कविमनाला ऐकू येतो. तीच भावना **कवी ग्रेस** यांच्या कवितेत स्वत:च्या मन:स्थितीशी निगडित असते. ते म्हणतात –

*पाऊस कधीचा पडतो*
*झाडांची भिजली पाने*
*हलकेच जाग मज आली*
*दु:खाच्या मंद स्वराने*

नेहमी हवाहवासा वाटणारा पाऊस त्याचा अतिरेक झाला की नकोनकोसा होतो. घरातली प्रिय व्यक्ती बाहेर असताना. पाऊस कोसळत राहतो. घराला गळती लागते. छपरातून येणाऱ्या पाण्याखाली घरातली गृहिणी छोटी पातेली ठेवते. मन भिऊ भिऊ होते. ही अस्वस्थता **इंदिरा संतांच्या** पुढील कवितेत व्यक्त होते.

*नको नको रे पावसा*
*असा धिंगाणा अवेळी*
*घर माझे चंद्रमोळी*
*आणि दारात सायली*

पाऊस येतो, तसा हळूहळू परतीच्या वाटेला लागतो. आता त्याची भेट थेट पुढल्या वर्षी या कल्पनेने मनाला हुरहूर लागते. **शिरीष पै** पावसाचा निरोप घेताना म्हणतात –

*नको नको रे पावसा*
*पुन्हा पुन्हा आठवूस*
*डोळे तुडुंब पाण्याने*
*माझे भराचा लावून*
*आली निरोपाची वेळ*
*जीव झाला कासाविस*
*पुन्हा पुन्हा आठवते*
*कुठे कुठे भेटलास.*

असा हा पाऊस व त्याची मोहवून टाकणारी नाना रूपे! पावसाची प्रत्यक्ष भेट नेमेचि होत राहतेच! पण कवी शब्दांत पकडलेले पावसाचे रूप आपल्या मनात सदैव जागे राहाते...


**– शैलजा देशमुख**
सी–१०२, पाटे संस्कृती, सहकारनगर नं. २, पुणे 411009

ऐका – कविता रसग्रहण
‘अनामवीरा’
कवयित्री – आश्लेषा महाजन

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर — इ. स. २०२०
कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेत भारत जगात दुसरा — इ. स. २०२१
स्वातंत्र्योत्तर भारताची अभिमानास्पद कालरेषा

वार्षिक देणगीदार – • सौ. उषा पुरंदरे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

# हसा हसाऽऽ



एका बागवानाच्या बागेत चिक्कूच्या झाडाला अनेक चिक्कू लागले होते. त्याकडे मधू टक लावून पाहात होता, नि मधून मधून हातातील एक रुपयाची चाळवाचाळव करीत होता. ''काय, चिक्कू हवाय?'' माळीबुवांनी विचारले.

''हं, हा टप्पोरा मोठा केवढ्याचा? १ रुपयाला देता?

''चल, १ रुपयाला म्हणे? वाटेवर लागला आहे की नाही.'' असे म्हणत माळी एका कच्च्या-दोड्या चिक्कूला हात लावून म्हणाला, ''हवा तर हा मिळेल १ रुपयाला.''

१ रुपया माळ्याच्या हातात टाकीत मधू म्हणाला, ''बरं-बरं, तो चिक्कू घेतला मी! हे पैसे!! फक्त तो आणखी दहा दिवसांनी पिकल्यावर काढून घेऊन जाईन मी हं!!


**छात्र प्रबोधन मासिकाचे आजच सभासद व्हा!**

*सवलत ३१ ऑगस्टपर्यंत लागू!

**वार्षिक वर्गणी : ₹ ~~२००~~, ₹ १८०* इ-अंक वार्षिक वर्गणी : ₹ ~~१००~~, ₹ ३०*** (दिवाळी अंक सोडून)

**ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी jpprakashane.org या संकेस्थळाला भेट द्या!!**

**subscription/सभासदत्व येथे क्लिक करा!**


**पान क्र. १८ वरील म्हणींची उत्तरे –** १) गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली. २) बळी तो कान पिळी. ३) शिंक्याचे तुटले बोक्याचे फावले. ४) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र.

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २१/११)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

**या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ सप्टेंबर २०२१ पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.**

**प्रश्नांची उत्तरे लिहा –**

१) अनूच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अनू व तिच्या मैत्रिणींच्या मनात कोणते नवीन विचार रुजायला सुरुवात झाली?

२) 'कवितेतला पाऊस' या लेखातील कोणतीही एक कविता पूर्ण मिळवून लिहा व कवितेचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.

३) *यु-ट्यूबवर* असणाऱ्या चित्रफितींचे कोणते प्रकार लेखात आले आहेत?

४) साखरेमध्ये असलेली भेसळ तुम्ही कशी ओळखाल?

५) माहितीपर ओळींमधली नव्वदच्या दशकातील कोणत्याही एका घटनेची माहिती तपशीलात इंटरनेटवरून/आई-बाबांकडून मिळवा व त्याविषयी तुमचे मत तुमच्या शब्दांत लिहून काढा.


हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९४३, १ ऑगस्ट २०२१ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे -९ येथे छापून,ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

यह मासिक पत्रिका ज्ञान प्रबोधिनी संस्था के स्वामित्व में है। मासिक के मुद्रक, प्रकाशक और संपादक श्री. महेन्द्र सेठिया इन्होने यह मासिक राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९४३ तथा १ अगस्त २०२१ इस दिनांक पर प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ यहाँ मुद्रण कर के ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० से प्रकाशित की है।

# हे कर्मयोगिन्



वाचस्पती कै. वि. वि. तथा आप्पा पेंडसे

या पद्याची चाल ऐका आणि पद्य म्हणा!

हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या असंख्यात ज्योतिर्दळे लावली
जरी दाट अंधार आहे सभोती तरी आमुची वाट तेजाळली ।। ध्रु. ।।

दिली ध्येयनिष्ठा दिली कार्यनिष्ठा, मनी रेखलेली श्रमाची प्रतिष्ठा
समाजार्थ नि:स्वार्थ सेवा कराया तुम्ही त्यागदीक्षा आम्हाला दिली
हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या कृतीने नवी प्रेरणा कोरली ।। १ ।।

जेथे घोर अन्याय थैमान घाली तिथे धावुनी जा तुम्ही निर्भय
पटे सत्य तेथे तुम्ही ठाण मांडा युवाशक्ति आहे जगी दुर्जय
उद्याच्या जगाचे नवे स्वप्न देखा, दिसू दे तुम्हाला उष:कालरेखा
अरे आज जे गांजले-पोळलेले मिळू दे सुखाची तयां सावली
हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या अशी ध्येयसृष्टीच साकारली ।। २।।

तपस्वी मनस्वी जरी आकृती ती नसे आज साक्षात् समोरी उभी
स्मृतींच्या कृतींच्या हजारो शलाका तरी चेतलेल्या मनाच्या नभी
वसा टाकुनी दूर जाणार नाही, रणातून माघार घेणार नाही
अम्हि अंतरात्म्यास साक्षी करोनी मनाने प्रतिज्ञा अशी घेतली
हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या नवी वज्रबीजेच ही पेरली ।। ३ ।।

– वाचस्पती स्वर्णलता भिशीकर

---

**पद्याचा अर्थ :** ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक, आद्य संचालक, वाचस्पती वि. वि. तथा आप्पा पेंडसे यांचा १७ ऑगस्ट हा जन्मदिन तर १९ ऑगस्ट हा स्मृतिदिन! त्यानिमित्ताने त्यांचे स्मरण करून युवकांना त्याच्यापासून कार्यप्रेरणा मिळते, हे सांगणाऱ्या पद्याचा परिचय करून घेऊ.

'हे कर्मयोगी, तुम्ही आम्हाला प्रेरणा देऊन मनात असंख्य अशा ज्योती लावून आमचा मार्ग प्रकाशित केला आहे. आज नैतिक, सामाजिक, वैचारिक आघाडीवर सर्वत्र कुकर्मांचा काळोख पसरला आहे. तो दूर करण्याचे उच्च ध्येय मनात बाळगण्याची प्रेरणा तुम्ही दिली आहे. ध्येय साध्य करायचे तर निष्क्रिय राहून चालणार नाही. आपली आपल्या कामावर निष्ठा हवी, त्यासाठी कष्ट करण्याची तयारी हवी, समाजाची सेवा करायची, तर व्यक्तिगत सुखांचा त्याग करायला हवा;' या मंत्राची दीक्षा तुम्ही आम्हाला दिली आहे.

'जेथे जेथे अन्याय घडतो तेथे तुम्ही निर्भयतेने संघर्ष करा. जे दु:खी आहेत, ज्यांच्यावर अन्याय होतो आहे, त्यांना सुखाची सावली मिळावी म्हणून तुम्ही झटायला हवं. असत्याशी लढा द्यायला हवा. उद्याच्या निर्मळ जगाचे स्वप्न पाहण्याचं सामर्थ्य युवाशक्तीत आहे, ते तुम्ही वापरा;' असे विचार आमच्या मनात येऊन एक नवे उज्ज्वल ध्येयच तुम्ही आमच्यासमोर उभे केले आहे. आज जरी तुम्ही आमच्यात नसलात, तरी तुमचे कार्य आणि विचार यांनी आमच्या मनात चेतना पेरली आहे. विश्वाच्या उद्धाराचे जे स्वप्नव्रत आम्ही मनापासून घेतले आहे, त्यापासून आम्ही दूर जाणार नाही.

'हे कर्मयोगी, तुमच्या कृतीतून, विचारातून, अध्यात्मातून तुम्हीच या कर्मयोगाची बीजे आमच्या मनात पेरली आहेत. त्याच वाटेने आम्ही जाऊ,' असे आश्वासन प्रस्तुत पद्यातून युवापिढी देते आहे; असे प्रेरणादायी चित्र कवयित्रीने रेखाटले आहे.

**सौर श्रावण, शके १९४३/ऑगस्ट २०२१ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan**
**प्रकाशन दिनांक : सौर १० श्रावण, शके १९४३/१ ऑगस्ट २०२१**
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)
**टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023**
**Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-8-2021**



**लेहमधील शे राजवाड्यावरून दिसणारा लेहचा निसर्गरम्य नजारा Nikon P100 या कॅमेऱ्याने टिपला आहे!**

**– मानस कुलकर्णी,** mp.kulkarni25@gmail.com

| सौर दिनदर्शिका शके १९४३ | | |
|---|---|---|
| | ऑगस्ट २०२१ | श्रावण भाद्रपद |
| र. | 1 | श्रा.१० |
| सो. | 2 | ११ |
| मं. | 3 | १२ |
| बु. | 4 | १३ |
| गु. | 5 | १४ |
| शु. | 6 | १५ |
| श. | 7 | १६ |
| र. | 8 | १७ |
| सो. | 9 | १८ |
| मं. | 10 | १९ |
| बु. | 11 | २० |
| गु. | 12 | २१ |
| शु. | 13 | २२ |
| श. | 14 | २३ |
| र. | 15 | २४ |
| सो. | 16 | २५ |
| मं. | 17 | २६ |
| बु. | 18 | २७ |
| गु. | 19 | २८ |
| शु. | 20 | २९ |
| श. | 21 | ३० |
| र. | 22 | ३१ |
| सो. | 23 | भा.१ |
| मं. | 24 | २ |
| बु. | 25 | ३ |
| गु. | 26 | ४ |
| शु. | 27 | ५ |
| श. | 28 | ६ |
| र. | 29 | ७ |
| सो. | 30 | ८ |
| मं. | 31 | ९ |

| | |
|---|---|
| सभासदांनी आपले व्हॉटस् ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०११११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी संपर्क साधता येईल. | सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा. |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत : ₹ २०**
**वार्षिक वर्गणी : ₹ २००**

**प्रिय पोस्टमन,**

कोरोनाच्या संकटकाळातही जोखीम पत्करून हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे.

तुम्ही सुरक्षित राहावे ही प्रार्थना व सर्वतोपरी काळजी घ्यावी, ही आपुलकीच्या नात्याने विनंती!

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन